बंद शाळांचे पुनरुज्जीवन आवश्यक

शिक्षणमंत्री दादा भुसे यांचे प्रतिपादन; मनपा शाळांची पाहणी

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : महानगरपालिका हद्दीतील बंद असलेल्या शाळांची आवश्यक दुरुस्ती व पायाभूत सुविधांसह पुनरुज्जीवन करून त्या पुन्हा सुरू कराव्यात. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, स्वच्छ व सुविधायुक्त शैक्षणिक वातावरण निर्माण करून विद्यार्थीसंख्या वाढविण्यासाठी प्रभावी नियोजन करावे, असे निर्देश शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिले.

मंत्री भुसे यांनी रविवारी पंचवटी येथील मनपा प्राथमिक शाळा क्रमांक ३०, सिडको येथील मनपा माध्यमिक शाळा तसेच जेलरोड येथील मनपा शाळा क्रमांक ५६ या शाळांची पाहणी केली. त्यावेळी त्यांनी सूचना दिल्या. मंत्री भुसे यांनी शाळांमधील उपलब्ध शैक्षणिक सुविधा, वर्गखोल्या, इमारतींची सद्यस्थिती, पायाभूत सुविधा तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घेतला. महानगरपालिका हद्दीतील सध्या बंद असलेल्या सर्व शाळांची सद्यस्थिती तपासून त्यांचे योग्य पद्धतीने वर्गीकरण करावे. ज्या शाळांच्या इमारती अथवा परिसरात दुरुस्तीची आवश्यकता आहे, तेथील कामे प्राधान्याने आणि तातडीने पूर्ण करावीत. शाळा सुरू करण्यासाठी आवश्यक मूलभूत सुविधा, स्वच्छता, सुरक्षितता, वर्गखोल्या तसेच विद्यार्थ्यांसाठी आवश्यक इतर सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना भुसे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

मनपा शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच शाळांच्या इमारती व परिसर विद्यार्थ्यांना आकर्षित करतील, यासाठी आवश्यक सुधारणा करणे गरजेचे आहे. शाळांमध्ये सकारात्मक व आनंददायी वातावरण निर्माण झाल्यास पालकांचा मनपा शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक होण्यास मदत होईल. त्यामुळे बंद शाळा पुन्हा सुरू करण्यासोबतच तेथील विद्यार्थीसंख्या वाढविण्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही मंत्री भुसे यांनी सांगितले.

महापौर हिमगौरी आहेर-आडके, उपमहापौर विलास शिंदे, अजय बोरस्ते, प्रवीण तिदमे यांच्यासह महानगरपालिका प्रशासनातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.



पंचवटी येथील मनपा प्राथमिक शाळा क्रमांक ३० ची पाहणी करताना शिक्षणमंत्री दादा भुसे. समवेत महापौर हिमगौरी आडके, उपमहापौर विलास शिंदे, अजय बोरस्ते आदी

शैक्षणिक नियोजन करण्याच्या सूचना

महानगरपालिका शाळांच्या पाहणीदरम्यान उपलब्ध शैक्षणिक साधने, विद्यार्थ्यांसाठीच्या सुविधा तसेच आवश्यक असलेल्या सुधारणा याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. ज्या ठिकाणी आवश्यक कामे प्रलंबित आहेत, ती कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

संक्षिप्त

महिला महाविद्यालयात आजपासून कार्यक्रम

नाशिक : येथील गोखले एज्युकेशन सोसायटीतील एस.एम.आर.के. महिला महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे ६ ते १० ऑक्टोबर या काळात विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. मंगळवारी सकाळी ११ वाजता विद्यार्थिनींसाठी काव्यवाचन स्पर्धा होईल, निसर्ग आणि मैत्री या दोन विषयांवरील कविता विद्यार्थिनी सादर करतील. विजेत्यांना १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिनाच्या कार्यक्रमात गौरवले जाईल. ६ ऑक्टोबर रोजी प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर यांच्या हस्ते वाङ्मय मंडळाचे उद्घाटन होणार आहे. सात रोजी सकाळी ९.३० वाजता पाटणकर सभागृहात अभ्यासक्रमात समाविष्ट असलेला मराठी चित्रपट पडद्यावर दाखविण्यात येणार असून चित्रपट रसास्वाद आणि त्यावर मुक्त गटचर्चा घेण्यात येणार आहे. १० तारखेला मराठी भाषा व साहित्य विषयावर आधारित ऑनलाइन प्रश्नमंजूषा होईल.

इगतपुरी तालुक्यात बिबट्यांची दहशत

शेतातील संचारामुळे शेतकऱ्यांमध्ये भीती

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : इगतपुरी तालुक्यात बिबट्याचा संचार वाढल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबटे शेताच्या बांधावर, रस्त्यालगत तसेच गावांच्या आसपास कुठेही दिसत आहेत. पावसाळा संपल्याने शेतीची कामे आणि पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात जावे लागत असल्याने त्यांच्यासमोर बिबट्यांमुळे संकट उभे ठाकले आहे.

यावर्षी पावसाने अपेक्षित साथ न दिल्याने इगतपुरी तालुक्याच्या अनेक भागांत पाण्याची उपलब्धता कमी आहे. त्यामुळे पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना रात्री-अपरात्री मोटार सुरू करण्यासाठी किंवा शेतातील पाण्याची पाहणी करण्यासाठी जावे लागत आहे. इगतपुरी तालुका डोंगराळ आणि मोठ्या प्रमाणात वनक्षेत्र असलेला भाग असल्याने बिबट्यांसह विविध वन्यप्राण्यांचा अधिवास या परिसरात आहे. जंगलालगतची गावे, शेतवस्त्या आणि मानवी वस्तीच्या आसपास वन्यप्राण्यांच्या हालचाली वाढल्याने मानव-वन्यजीव संघर्षाचा प्रश्नही गंभीर होत आहे. त्यामुळे केवळ बिबट्या दिसल्यानंतर पिंजरा लावण्याऐवजी त्याच्या हालचालींचे क्षेत्र निश्चित करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे. बिबट्याचा वावर आढळल्यानंतर वनविभागाकडे माहिती देण्यासाठी नागरिक संपर्क साधतात. मात्र संबंधित अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांशी संपर्क साधताना अडचणी येत असल्याच्या तक्रारी शेतकरी व ग्रामस्थांकडून केल्या जात आहेत. तालुक्यातील वनपरिमंडळ अधिकारी कोण आणि कोणत्या भागासाठी कोणते वनपाल जबाबदार आहेत, याची स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने तक्रार करायची कुठे, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. बिबट्याचा वावर असलेल्या गावांमध्ये वनविभागाने नियमित गस्त वाढवावी, नागरिकांना तातडीचा संपर्क क्रमांक उपलब्ध करून द्यावा अशी मागणी होत आहे.

नाशिक जिल्ह्यात १५६ कोतवाल भरती

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : गाव पातळीवरील महसूल यंत्रणेला मजबूत करण्यासाठी अनेक वर्षांपासून रिक्त असलेल्या जिल्ह्यातील १५ तालुक्यांमधील १५६ महसूल सेवक अर्थात कोतवालांची पदे भरली जाणार आहे. यासाठी अर्ज प्रक्रियेला सुरुवात झाली असून १७ ऑक्टोबरपर्यंत ऑनलाइन अर्ज भरण्याची मुदत आहे. नाशिक जिल्ह्यातील महसूल विभागातील १५६ रिक्त महसूल सेवक (कोतवाल) पदांच्या भरतीस शासनाने मान्यता दिली. या भरती प्रक्रियेसाठी ३ ते १७ ऑक्टोबर या कालावधीत उमेदवारांना ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत. तालुकानिहाय रिक्त पदांनुसार नाशिक - १६, सुरगाणा (१०० टक्के) - १२, त्र्यंबकेश्वर (१०० टक्के) - ३, पेठ (१०० टक्के) - ४, बागलाण-२६, देवळा - ८, इगतपुरी - १०, दिंडोरी- १६, कळवण (१०० टक्के) - १४, चांदवड-४, निफाड - ११, येवला - ५, सिन्नर - ७, मालेगाव - १४, नांदगाव-६ यानुसार जिल्ह्यात एकूण १५६ रिक्त महसूल सेवक (कोतवाल) पदे भरण्यात येणार आहेत. कोतवाल हा प्रशासन आणि जनतेतील महत्त्वाचा दुवा म्हणून तो कार्यरत असतो. या भरतीतून महसूल यंत्रणेला बळकटी दिली जाणार आहे.

निकष काय, मानधन किती?

महसूल सेवक अर्थात कोतवाल या पदासाठी १८ ते ४० वयोगटातील पात्र उमेदवार अर्ज करू शकतो. या पदासाठी चौथी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. १०० गुणांच्या लेखी परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी ४० गुण मिळविणे आवश्यक आहे. महसूल सेवक (कोतवाल) या पदासाठी १५ हजार रुपये मानधन दिले जाईल. नाशिक.कोतवाल.ओआरजी या संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. तिथे तालुकानिहाय उपलब्ध पदांची माहिती दिलेली आहे. भरती संदर्भात कोणतीही शंका असल्यास संबंधित तहसील कार्यालय किंवा उपविभागीय अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी (महसूल) कुंदन हिरे यांनी केले आहे.

जातपंचायतविरोधी कार्यासाठी कृष्णा चांदगुडे यांचा गौरव

नाशिक : येथील सामाजिक कार्यकर्ते व अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांना भटके विमुक्त समाजाचा कार्यगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्यभर कार्यरत असणाऱ्या भटका विमुक्त शोषित समुदाय संघर्ष संघटनेतर्फे हा पुरस्कार देण्यात आला.

पुणे येथे साने गुरुजी स्मारक येथे झालेल्या समारंभात नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त प्रमोद कुमार पवार, नाशिक स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुमंत मोरे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरू अशोक महाजन यांच्या हस्ते चांदगुडे यांना जातपंचायतींच्या मनमानीविरोधातील केलेल्या कामाबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला. चांदगुडे हे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या जातपंचायत मूठमाती अभियानाचे राज्य कार्यवाह आहेत. जातपंचायतचे प्रस्थ बहुतांश जातीत असले तरी भटके विमुक्त समाजात त्याचे क्रौर्य व अघोरी शिक्षा भयानक आहेत. २०१३ साली नाशिक येथे आंतरजातीय विवाह केल्यामुळे भटके विमुक्त समाजातील एका गर्भवतीचा तिच्या पित्याने खून केला होता. यामागे जातपंचायतीचा दबाव असल्याचे चांदगुडे यांनी कार्यकर्त्यांबरोबर शोधून काढले होते.

त्यानंतर डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या दूरदृष्टीतून नाशिक येथून जातपंचायत मूठमाती अभियान सुरू झाले. पुढे ते राज्यभर पोहचले. जातपंचायत विरोधातील लढ्यामुळे २०१६ ला राज्य सरकारने 'सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा' संमत केला. चांदगुडे यांच्या प्रयत्नाने भटके विमुक्त समाजातील १९ जातपंचायती बरखास्त करण्यात आल्या. समाजातील अनेक अंधश्रद्धा व कुप्रथा थांबविण्यात त्यांना यश आले आहे.

नाना ओक स्मृती संगीत संमेलन उद्यापासून

नाशिक : येथील ओक परिवार आणि आयटीसी संगीत रिसर्च अकॅडमी (कोलकाता) यांच्या संयुक्त विद्यमाने सात आणि आठ ऑक्टोबर रोजी नाना ओक स्मृती संगीत संमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संयोजक अर्चन ओक यांनी दिली.

दोन्ही दिवशी गंगापूर रोडवरील शंकराचार्य न्यासाच्या डॉ. कुर्तकोटी सभागृहात सायंकाळी सहा ते नऊ या वेळेत हे संगीत संमेलन होईल. सर्व रसिकांना विनामूल्य प्रवेश आहे. पहिल्या दिवशी श्रेया चटर्जी यांचे शास्त्रीय गायन होणार असून त्यांना तबल्यावर आशय कुलकर्णी, संवादिनीवर अमेय बिच्चू साथसंगत करतील. नंतर अबिर होसेन यांचे सरोद वादन होईल. त्यांना यशवंत वैष्णव तबलासाथ करणार आहेत.

आठ ऑक्टोबर रोजी परमानंद रॉय यांचे बासरी वादन होईल. समारोप पं. उल्हास कशाळकर यांच्या शास्त्रीय गायनाने होईल.

ICICI Home Finance | कॉर्पोरेट कार्यालय : आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०५९, भारत.

शाखा कार्यालय : शॉप नं. ६०४ व ६०५, ललित रुंग्टा ग्रुप, ६वा मजला, रुंग्टा सुपरमस, चांदक सर्कल, तिडके कॉलनी, नाशिक - ४२२००२, महाराष्ट्र.

[रुल ८ (६)च्या तरतुदी पाहा] स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ८(६)च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

सूचना याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको व हमीदारांना देण्यात आली आहे की, सुरक्षित धनकोकडे याखाली वर्णिलेली स्थावर मालमत्ता गहाण आहे / ताब्यात आहे, सदर स्थावर मालमत्तेचा ताबा "आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि."च्या प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला आहे व सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या संक्षिप्त तपशीलानुसार "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे", आणि "जे काही आहे तेथे आहे" या तत्वावर करण्यात येणार आहे :

अनु क्र.	ऋणको / सह-ऋणको / हमीदार / कायदेशीर वारसदारांची नावे / लोन अकाऊंट नं.	ज्ञात भारासमवेत, जर असल्यास, सुरक्षित मत्तेचा तपशील	थकित रक्कम	राखीव किंमत / इसारा रक्कम ठेव	मालमत्तेच्या पाहाणीची तारीख व वेळ	लिलावाची तारीख व वेळ	लिलाव तारखेपूर्वी एक दिवस	सरफेसी स्टेज
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)	(एच)	(आय)
१.	सावीन तानाजी नागरे (ऋणको) / सुष्मा सावीन नागरे (सह-ऋणको)/लोन अका. नं. : LHNAS00001480332 & LHNAS00001480333	फ्लॅट नं. सी-१, पहिला मजला, "सी" विंग मधील, "गिल गार्डन अपार्टमेंट", प्लॉट नं. २१, सर्व्हे नं. ११/२/१२१/ १, नाशिक - ४२२००३, महाराष्ट्र.	रु. १५,३८,३६४/- ०१ ऑक्टोबर, २०२६	रु. १६,७१,८४०/- / रु. १,६७,१८४/-	१५ ऑक्टोबर, २०२६ रोजी स. ११:०० ते दु. ०३:००	२२ ऑक्टोबर, २०२६ रोजी दु. ०२:०० ते दु. ०३:००	२१ ऑक्टोबर, २०२६ रोजी सायं ०५:०० पूर्वी	सांकेतिक ताबा

ऑनलाईन लिलावाचे आयोजन आमची लिलाव एजन्सी "व्हॅल्यूट्रस्ट कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड"च्या वेबसाइटवरून (URL Link - https://BidDeal.in) करण्यात येणार आहे. गहाणकारांना २१ ऑक्टोबर, २०२६ रोजी सायं ०५:०० वा पूर्वी पुढील व्याजासह एकूण देणींचे प्रदान करण्यास शेवटची संधी देण्यात आली आहे, अन्यथा या सुरक्षित मत्तेचे वरील वेळापत्रकानुसार विक्री करण्यात येणार आहे. स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी २१ ऑक्टोबर, २०२६ रोजी दु. ०४:०० वा किंवा तत्पूर्वी यावर नमूद केलेल्या "आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड"च्या, शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर आरटीजीएस / डिमांड ड्राफ्ट (डीडी) द्वारा इसारा रक्कम ठेव (रकाना "ई" पाहा) सादर केली पाहिजे. स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी २१ ऑक्टोबर, २०२६ रोजी सायं ०५:०० वा किंवा तत्पूर्वी यावर नमूद केलेल्या "आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड", शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर नोंदणी प्रपत्र व बोलीच्या शर्ती व अटींची स्वाक्षरीकृत प्रत सुद्धा सादर केली पाहिजे. डिमांड ड्राफ्ट (डीडी) स्वरूपातील इसारा रक्कम ठेव वर नमूद केलेल्या शाखा कार्यालयीन पत्त्यावर देय "आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.-ऑक्शन"च्या नावे नॅशनलाईज्ड / शेड्युल्ड बँकेकडील असली पाहिजे.

मालमत्तेची पाहाणी, लिलावाच्या शर्ती व अटी किंवा निविदांच्या सादरीकरणासंबंधित कोणत्याही अधिक स्पष्टिकरणाकरिता, कृपया "आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड"शी ९९२०८०७३०० यावरून संपर्क साधावा.

प्राधिकृत अधिकारी कोणतीही पुढील कारणे न देता कोणतीही किंवा सर्व बोली नामंजूर करण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया https://www.icicihfc.com/ यावर भेट द्यावी.

दिनांक : ०६ ऑक्टोबर, २०२६ | प्राधिकृत अधिकारी, "आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड"

स्थळ : नाशिक | सीआयएन नंबर : U65922MH1999PLC120106

LIC HFL LIC HOUSING FINANCE LTD

एलआयसी हौसिंग फायनान्स लि. — मागणी नोटीस

बॅक ऑफिस : "जीवन श्री", १९०९, विद्यापीठ रोड, शिवाजीनगर, पुणे ४११०१६, महाराष्ट्र

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (सरफेसी ॲक्ट) च्या सेक्शन १३(२) मधील अंतर्गत सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल २००२ चा रूल ३(१) सह

जसे की, खाली सही करणार **एलआयसी हौसिंग फायनान्स लिमिटेड (एलआयसीएचएफएल)** चे अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन अँण्ड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३ (२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या सेक्शन १३ (१२) व रूल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार/जामिनदार यांना मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत नमूद केलेली येणे असलेली एकूण रक्कम सदर नोटीस प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत परत करावी. विविध कारणास्तव ह्या नोटीसेस संबंधित कर्जदार/मालमत्ताधारक/जामिनदार यांच्या पर्यंत पोचू शकल्या नाहीत. या नोटीसींच्या प्रती खाली सही करणार यांच्याकडे उपलब्ध आहेत आणि संबंधित कर्जदार/ मालमत्ताधारक/ जामीनदार त्यांच्या इच्छेनुसार खाली सही करणार यांच्याकडून कामाच्या कोणत्याही दिवशी कार्यालयीन वेळेत घेऊन जाऊ शकतात. परंतु, संबंधित कर्जदार यांना नोटीस देण्यात येते की त्यांचा जसा संबंध असेल त्यानुसार तो/ती किंवा त्यांचा वारस यांना ज्यांना लागू असेल त्यांनी ही नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत नोटीशीत नमूद केलेली रक्कम अधिक त्यावरील रक्कम जमा करण्याच्या तारखेपर्यंत होणारे व्याज, त्याचप्रमाणे कर्जाच्या आणि इतर करारानुसार तसेच संबंधितांनी केलेल्या करारानुसार अशी सर्व रक्कम एलआयसी हौसिंग फायनान्स लिमिटेड यांना परत करावीत. कर्जदारांच्या सुरक्षेसाठी आणि करारातील अटींनुसार कराराची कागदपत्रे व खाली नमूद केलेली मालमत्ता **एलआयसी हौसिंग फायनान्स लिमिटेड** यांच्याकडे गहाण ठेवण्यात आलेली आहे.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव व पत्रव्यवहारासाठी पत्ता	गहाण मालमत्तांचा तपशिल	मागणी नोटीशीची तारीख	मागणी रक्कम
१.	मयुर अनिल बकरे/नलिनी अनिल बकरे/ दीप्ती मयुर बकरे (कर्ज खाते क्र. ६२१२०००१३०७१, ६२१२०००१३२७५)	०५, तळमजला आणि पहिला, ३१ ते ४६ स. नं २८९/१ए/१/१ए, सुमंगल टाउन अपार्टमेंट, हन्ड्रेड हट्स आणि हरि विश्व प्रकल्पा मागे, हॉटेल एक्सप्रेस इन जवळ, पांडवलेणी, पाथर्डी शिवार, नाशिक, महाराष्ट्र - ४२२००९	२८.०९.२०२६	रू.४८,१२,२३३.९१ / रू.११,८३,८३९.४७
२.	मयुर अनिल बकरे/नलिनी अनिल बकरे/ दीप्ती मयुर बकरे (कर्ज खाते क्र. ६२१२०००१४६०३)	६०५, सहावा मजला, ३१ ते ४२, सुमनचंद्रा टाउन अपार्टमेंट, स. नं २८९/१ए/१/१ए, हरि विश्वास मागे, हन्ड्रेड हट्स प्रकल्पाजवळ आणि मुंबई आग्रा रोड, सुमनचंद्रा क्लब पाथर्डी शिवार, नाशिक महाराष्ट्र - ४२२००९	२८.०९.२०२६	रू.२८,५९,८६२.८०

जर संबंधित **एलआयसी हौसिंग फायनान्स लि.** ला सदर रक्कम परत करण्यास असफल ठरले तर, वर नमूद केलेल्या तारण मालमत्तेच्या संदर्भात सदर कायदा कलम १३(४) आणि लागू होणारे रूल्स यांसह संबंधित कर्जदार यांच्या खर्च आणि परीणामांसह जोखमीवर कारवाई करण्याचा एलआयसी हौसिंग फायनान्स लि. ला अधिकार आहे. सरफेसी ॲक्ट मधील तरतुदीनुसार संबंधित कर्जदार / जामीनदार यांना सदर मालमत्ता, कोणत्याही प्रकारे विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य मार्गाने **एलआयसी हौसिंग फायनान्स लि.** च्या लेखी अनुमतीशिवाय हस्तांतरीत करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. सदर तरतुदींचा भंग केल्यास सदर व्यक्ती सरफेसी ॲक्टमधील तरतुदींनुसार शिक्षा आणि / किंवा दंडास पात्र ठरेल.

दिनांक : ०६.१०.२०२६ | सही /- अधिकृत अधिकारी

ठिकाण : नाशिक (मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा) एलआयसी हौसिंग फायनान्स लि.

RBL BANK apna ka bank

आरबीएल बँक लि.

नोंदणीकृत कार्यालय : फर्स्ट लेन, शाहुपूरी, कोल्हापूर-४१६००१

शाखा कार्यालय : आरबीएल बँक लि., ९वा मजला, टेक्निप्लेक्स-I, वीर सावरकर फ्लायओव्हरलगत, गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०० ०६२.

सरफेसी ॲक्ट २००२च्या सेक्शन १३ (२) अंतर्गत सिक्युरिटायझेशन नोटीस

आम्ही, याखाली रकान्यांमध्ये नमूद केलेले अर्जदार व सह-अर्जदारांचे सुरक्षित धनको, "आरबीएल बँक लि.", तुम्हा सर्वांना कळवीत आहोत की, तुम्ही मुद्दल रक्कम व व्याजाचे प्रदान करण्यास/ परतफेड करण्यास कसूर दाखविल्यामुळे तुमच्या खात्याचे नॉन-परफॉर्मिंग अकाऊंट ("एनपीए") म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे आणि याखाली नमूद केलेल्या रकान्यात नमूद केलेली रक्कम **"आरबीएल बँक लि."**करिता रकमेवरील पुढील व्याजासह एकत्रीत, सूचनेच्या तारखेनुसार आता देय व देणी आहे. आम्ही पुनः पुन्हा मागण्या करूनसुद्धा तुम्ही तुमच्या खात्यातील थकित रकमेचे प्रदान करण्यास दुर्लक्ष केले आहे आणि तुम्ही तुमचे दायित्वांचे विमोचन केलेले नाही.

आम्ही, त्यामुळे सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत पूर्णतः तुमच्या दायित्वांच्या विमोचनाकरिता संविदात्मक दरातील लागू व्याज, किंमत, आकार, अन्य रक्कम यासह एकत्रित वर नमूद केलेल्या रकमेचे प्रदान करण्यास मागणी करणारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या चॅप्टर III च्या सेक्शन १३(२) अंतर्गत नोटीस जारी केली आहे.

कर्ज खाते क्र., ऋणकोचे नाव, १३(२) नोटीस तपशील आणि सांकेतिक ताबा तारीख	गहाणवट मालमत्तेचा तपशील
१) **श्री. रवींद्र त्रंबक खिल्लारे** (अर्जदार व गहाणकार) २) **श्रीमती सविता रवींद्र खिल्लारे** (सह-अर्जदार व गहाणकार) **पत्रव्यवहाराचा पत्ता** - १) एन४२/सीए३/८/४, त्रिमुर्ती चौक, शिवशक्ती नगर, न्यू सिडको, नाशिक - ४२२ ००९. २) काशिनाथ मटाले चावल, अवनी रेसिडंसीच्या मागे, कामतवाडे, त्रिमुर्ती चौक, नाशिक - ४२२ ००८. १. फ्लॅट नं. ए-८, "ए" विंग, तिसरा मजला, "अष्टविनायक पार्क अपार्टमेंट", ब्लोसम अॅकॅडमी इंग्लीश मिडियम स्कूलजवळ, दत्तनगर, व्हिलेज चुंचले, जि. नाशिक - ४२२ ०१०. **कर्ज खाते क्र.** : ८०९००७२४१३१३ **कर्ज रक्कम** : रू. १२,००,०००/- **एनपीए तारीख** : ०२.०८.२०२६ **१३(२) नोटीस दिनांकित** : २९.०९.२०२६ **१३(२) नोटीस रक्कम** : रू. ११,५३,९१२.३०/-	**गहाणवट मालमत्तेचे वर्णन, श्री. रवींद्र त्रंबक खिल्लारे व श्रीमती सविता रवींद्र खिल्लारे यांच्या मालकीची मालमत्ता** पुढील निवासी मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - मालमत्ता धारण केलेला फ्लॅट नं. ए-८, "ए" विंग, तिसरा मजला, "अष्टविनायक पार्क अपार्टमेंट", प्लॉट नं. १६ व १७, सीटीएस नं. १८२३, १७३३, सर्व्हे नं. ५३ए, प्लॉट नं. १६ व १७, एक्सलो प्लॉटजवळ, ब्लोसम अॅकॅडमी इंग्लीश मिडियम स्कूल, दत्त नगर, मोजमापाचे २६.१४ चौ.मी. बाल्कनीसह एकूण मोजमाप ३१.३६८ चौ.मी. आहे व येथे स्थित - व्हिलेज चुंचले, जि. नाशिक - ४२२ ०१०, महाराष्ट्र **जी पुढीलप्रमाणे सिमित व परिसिमित आहे** - पूर्वेला किंवा त्या दिशेने : फ्लॅट नं. ए-०९, दक्षिणेला किंवा त्या दिशेने : साईड मार्जिन व फ्लॅट नं. ए-७, पश्चिमेला किंवा त्या दिशेने : आकाशाच्या दिशेने खुले, उत्तरेला किंवा त्या दिशेने : बी विंग फ्लॅट नं. बी-०९.

आता, **आरबीएल बँक लि.**च्या प्राधिकृत अधिकारी याद्वारा तुमची संपूर्ण दायित्वे सोडविण्याकरिता रुल्सअंतर्गत तरतूद केल्यानुसार वरील मागणी सूचना समाविष्ट प्रसिद्धी देत आहोत, त्यास असमर्थ ठरल्यास आम्हास कोणत्याही पुढील संदर्भाशिवाय उक्त ॲक्टअंतर्गत दिलेल्या कोणत्याही किंवा सर्व हक्कांच्या निष्पादनाद्वारा आमच्या नावे तुमच्याद्वारा निर्मिती केलेल्या खालील सुरक्षेकरिता अंमलबजावणी करण्यास आम्हास भाग पडणार आहे. कृपया नोंद घ्यावी की, ही प्रसिद्धी ॲक्टअंतर्गत उक्त वित्तेचे ऋणको व हमीदारांच्या विरोधात "आरबीएल बँके"करिता उपलब्ध असलेले सदर हक्क व उपायासंबंधित कोणताही पूर्व-ग्रह न ठेवता देण्यात आली आहे. तुम्हास याअधिक नोंद घेण्याची विनंती करण्यात येते की, उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(१३) नुसार आमच्या पूर्व-लेखी परवानगीशिवाय वरील सुरक्षेशी व्यवहार किंवा तिची वासलात लावणे किंवा विक्री, भाडेपट्टा याद्वारा किंवा अन्य कोणत्याही तऱ्हेने हस्तांतरण करणे यापासून प्रतिबंधित/ मनाई करण्यात आली आहे.

स्वाक्षरी/-

स्थळ : नाशिक | आरबीएल बँक लि.

दिनांक : ०५.१०.२०२६ | प्राधिकृत अधिकारी

ACRE MAKING ASSETS WORK

असेट्स केअर & रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्राईज लि.

नोंदणीकृत कार्यालय: चौदावा मजला, एरॉस कॉर्पोरेट टॉवर, नेहरू प्लेस, नवी दिल्ली - ११००१९. टेली.: ९१-११-४३११५६०० फॅक्स: ९१-११-४३११५६१८

कॉर्पोरेट कार्यालय: ऑफिस क्र. १०१, कल्पतरू इन्फिनिया, प्लॉट बी, ग्रँड हयातजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - ४०००५५. टेली.: ०२२६८६४३१०१.

ई-मेल: acre.arc@acreindia.in वेबसाईट: www.acreindia.in CIN: U65993DL2002PLC115769

जोडपत्र IV-ए

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२ मधील नियम ८(६) व नियम ९(१) च्या तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे कर्जदार, सह-कर्जदार, गहाणकार व जामीनदार आणि आम जनतेस सूचित करण्यात येते की खालील वर्णनाच्या अचल मालमत्ता **मूळ धनको / अभिहस्तांकनकर्ता बँकेकडे तारण / भाग्रस्त होत्या आणि अभिहस्तांकनाच्या अगोदर अभिहस्तांकनकर्ता बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी त्यांचा प्रत्यक्ष ताबा घेतलेला होता आणि त्या आता असेट्स केअर & रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्राईज लि. [CIN: U65993DL2002PLC115769] ("सुरक्षित धनको")** यांना अभिहस्तांकित करण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार, आता सुरक्षित धनको कर्जदार, सह-कर्जदार, गहाणकार आणि जामीनदार यांचेकडून सुरक्षित धनकोस घेणे असलेल्या रकमांच्या वसुलीसाठी सदर मालमत्तांची "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे" तत्त्वावर विक्री करतील आणि प्रत्येक मालमत्तेसाठी आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम खाली नमूद करण्यात आलेली आहे.

तारण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील

अ.क्र.	कर्ज खाते क्र. आणि एसीआरई ट्रस्टचे नाव	कर्जदार / सह-कर्जदार/गहाणकार / जामीनदाराचे नाव	एकूण थकबाकी	आरक्षित किंमत	बयाणा रक्कम	बयाणा रकमेच्या भरण्यासाठी बँक खात्याचे तपशील	लिलाव दिनांक व वेळ	बयाणा रक्कम दिनांक व वेळ
१	१६२५६०३२ ACRE 158 TRUST	उज्जागीर बेचु यादव (कर्जदार) अमरावती उज्जागीर यादव (सह-कर्जदार)	०७.०९.२०२६ रोजीनुसार रु. २६,३९,५०७/- (रुपये सव्वीस लक्ष एकोणचाळीस हजार पाचशे सात फक्त) आणि भरणा आणि वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू व्याज, शुल्के व खर्च.	रु. १०,००,०००/- (रुपये दहा लक्ष फक्त)	रु. १,००,०००/- (रुपये एक लक्ष फक्त)	खाते क्रमांकः ACRE-158-ट्रस्ट खाते क्रमांकः ०९०११०२००००४१८७६ बँकः आयडीबीआय बँक आयएफएससी कोडः IBKL0000901	२२ ऑक्टोबर, २०२६ दु. २.३० ते ३.३० वाजेपर्यंत	२१ ऑक्टोबर २०२६ रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत

अनामत मत्तेचे वर्णन: सदनिका क्र. ४, दुसरा मजला, क्षेत्रफळ सुमारे ४८.७२ चौ.मी. (चटई क्षेत्रफळ), गौरी रेसिडेन्सी, सी.टी.एस. क्र. ५५५, स.क्र. ११०/४/२५, प्लॉट क्र. २५, तालुका पाथर्डी, जिल्हा नाशिक, महाराष्ट्र - ४२२०१०, आणि चतुःसीमा: पूर्वेस - मजला क्र. ५ व जिना, पश्चिमेस - सामासिक अंतर, उत्तरेस ० सामासिक अंतर आणि पलिकडे प्लॉट क्र. २५, दक्षिणेस - बीएम कॉलनी रोड.

अचल मालमत्तेसह सर्व हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, अंतर्निहित अनामती, तारणे आणि/किंवा जामीनांसह वरील कर्ज खाती वर नमूद स्तंभामध्ये स्पष्टपणे नमूद केलेल्या विविध ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून काम पाहणाऱ्या असेट्स केअर & रिकंस्ट्रक्शन एन्टरप्राईज लि. यांना अभिहस्तांकित करण्यात आलेली आहेत.

लिलाव प्रक्रियेसंदर्भातील महत्वाची माहिती

१.	बयाणा रकमेचा भरणा वर नमूद करण्यात आलेल्या बँक खात्यामध्ये डिमांड ड्राफ्ट / आरटीजीएस / एनईएफटीच्या माध्यमातून करण्यात यावा.	
२.	लिलावासाठी वेबसाईट	www.bankeauctions.com
३.	संपर्क तपशील	रोहन सावंतः ९८३३१४३०१३ / अक्षय हसीजा - ८०८०२३९६११
४.	मालमत्तेची पाहणी केवळ आधी वेळ घेऊनच करता येईल.	
५.	विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया वेबसाईटला भेट द्यावी www.acreindia.in / www.bankeauctions.com	

दिनांकः ०६.१०.२०२६ | स्वा/-

स्थानः नाशिक | प्राधिकृत अधिकारी

असेट्स केअर & रिकंस्ट्रक्शन एन्टरप्राईज लि.

ICICI Bank | **शाखा कार्यालय:** आयसीआयसीआय बँक लिमिटेड, तिसरा मजला, पुष्पा पार्क, क्रोमाच्या वरशोरूम, बोधले नगर, नाशिक-पुणे रोड, महाराष्ट्र- ४२२०११.

जाहीर सूचना - तारण मत्तेच्या विक्रीसाठी निविदा ई- लिलाव

[नियम ८(६) चे तरतुदीकडे पहा]

स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता सूचना

वित्तीय मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२ अन्वये तसेच सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ (६) च्या परंतुकासह स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य लोक आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जी सिक्युअर्ड क्रेडीटर यांच्याकडे गहाण/ चार्ज करण्यात आली असून, त्याचा **प्रत्यक्ष ताबा** आयसीआयसीआय बँक लि.चे अधिकारी यांनी घेतला असून ती "जसे आहे जिथे आहे", "जे आहे ते आहे" आणि "तेथे जे असेल ते" या आधारे होणार आहे, त्याचे तपशील खाली देण्यात आले आहेत.

अ. क्र.	कर्जदाराचे/सह-कर्जदाराचे/ हमीदाराचे नाव/ कर्ज खाते क्रमांक	काही असल्यास ज्ञात बोजासह तारण मत्तेचा तपशील	थकबाकी रक्कम ₹	आरक्षित मूल्य (₹) / इसारा अनामत ठेव ₹	मालमत्तेच्या परीक्षणाची तारीख आणि वेळ	ई-लिलाव तारीख आणि वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
1.	श्रीमती सीमा उमेश व्होरा (कर्जदाराचे) श्री उमेश जगदीश व्होरा (सह कर्जदाराचे) कर्ज खाते क्र. LBNAS00003638830	फ्लॅट क्र. १०२, पहिला मजला, बी विंग, प्लॉट क्र. ५५ आणि ६६, व्हॅली ऑफ फ्लावर्स (प्लॉट क्र. ५५ ते ६६)- इमारत बी, पुरोहित हॉटेलजवळ, नाशिक-पुणे महामार्ग, अशोक युनिव्हर्सल स्कूलच्या मागे, सिन्नर, नाशिक (सर्व्हे क्र. ९३६/१/३, ९३६/२ए, ९३६/३), महाराष्ट्र, सिन्नर-४२२१०३; मोजमापित क्षेत्र- ४१.०२ चौ. मीटर कार्पेट (म्हणजेच ४४३.५ चौ. फूट) + बाल्कनी २ चौ. मीटर (म्हणजेच २१.५ चौ. फूट).	₹ १८,७५,६१६/- (सप्टेंबर २३,२०२६ पर्यंत)	₹ ७,००,०००/- / ₹ ७०,०००/-	ऑक्टोबर १३,२०२६ सकाळी ११:०० दुपारी ०२:००पर्यंत	ऑक्टोबर २८, २०२६ सकाळी ११:०० पासून
2.	श्रीमती रेखाबाई मधुकर चौधरी (कर्जदाराचे) श्री. मधुकर किसन चौधरी (सह कर्जदाराचे) कर्ज खाते क्र. LBNDB00005328685	कसार गल्ली, देसाईपुरा जवळ, दादा गणपती रोडच्या मागे, सीटीएस क्र. १४३६/१, कसबे नंदुरबार शिवार, ता. व जि. नंदुरबार, महाराष्ट्र ४२५४१२; मोजमापित क्षेत्र- ७५.२० चौ. मीटर.	₹ २२,७८,२०३/- (सप्टेंबर २८,२०२६ पर्यंत)	₹ १३,८२,०००/- / ₹ १,३८,२००/-	ऑक्टोबर १३,२०२६ दुपारी ०२:०० संध्याकाळी ०५:००पर्यंत	ऑक्टोबर २८, २०२६ सकाळी ११:०० पासून

ऑनलाईन लिलाव **(https://BidDeal.in) मेसर्स व्हॅल्यूट्रस्ट कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड** या ई-लिलाव एजन्सीच्या वेबसाईटवर आयोजित करण्यात येईल. तारणदार/नोटीसी यांना **ऑक्टोबर २७, २०२६** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजण्यापूर्वी एकूण थकबाकी आणि पुढील व्याजासह रक्कम परतफेड करण्याची संधी देण्यात येत आहे, अन्यथा सदर तारण मालमत्तावरील परिशिष्टाप्रमाणे विक्री करण्यात येईल. संभाव्य बोलीदारांनी बयाणा रक्कम (ईएमडी) **आयसीआयसीआय बँक लिमिटेड, तिसरा मजला, पुष्पा पार्क, क्रोमाच्या वरशोरूम, बोधले नगर, नाशिक-पुणे रोड, महाराष्ट्र- ४२२०११** यांचेकडे डीमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई पहा) **ऑक्टोबर २७, २०२६** रोजी **संध्याकाळी ०४.००** वाजणेपूर्वी सादर करावी आणि त्यानंतर त्यांनी त्यांचा प्रस्ताव फक्त वर नमूद वेबसाईटमार्फत **ऑक्टोबर २७, २०२६** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजणेपूर्वी ईएमडीच्या पैसे भरल्याच्या पुराव्यासाठी बँक पोचसह - डीडीची स्कॅन केलेल्या ईमेजसह सादर करणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्यावी, जर संभाव्य बोलीदारांना वेबसाईटमार्फत त्यांचे प्रस्ताव सादर करणे शक्य नसल्यास, स्वाक्षरीकृत निविदा दस्तावेजाची प्रत **आयसीआयसीआय बँक लिमिटेड, तिसरा मजला, पुष्पा पार्क, क्रोमाच्या वरशोरूम, बोधले नगर, नाशिक-पुणे रोड, महाराष्ट्र- ४२२०११** येथे **ऑक्टोबर २७, २०२६** रोजी **संध्याकाळी ५.००** वाजण्यापूर्वी सादर करता येतील. बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत/वर्गीकृत बँकेकडील डीडी/पीओ **"आयसीआयसीआय बँक लिमिटेड"** यांच्या नावे **नाशिक** येथे देय सादर करावा. तपासणीसंबंधित, ई-लिलावाच्या शर्ती व अटी किंवा निविदा सादर करण्याशी संबंधित कोणत्याही खुलाशाकरिता कृपया **आयसीआयसीआय बँक लिमिटेडशी ७९७७२७२४८१/९५६१०८७५२२** वर संपर्क करा.

कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली स्विकारणे किंवा नाकारणेचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे राखीव आहे.

विक्रीच्या विस्तृत शर्ती व अटींकरिता कृपया भेटा **www.icicibank.com/n4p4s**

दिनांक : ऑक्टोबर ०६, २०२६, ठिकाण : नाशिक | प्राधिकृत अधिकारी, आयसीआयसीआय बँक लिमिटेड